# रा.भा.शिर्के प्रशाला, रत्नागिरी
# वार्षिक अहवाल सन २०१५-१६

१. इयत्ता १० वी March 2015 Result – २९६–१००% ( प्रविष्ठ – २९६, उत्तीर्ण – २९६)

| अ.क्र. | विद्यार्थ्यांचे नाव | गुण | टक्के |
|---|---|---|---|
| १. | कु.तेजस दिपक बंडबे | ४८२/५०० | ९६.४०% |
| २. | कु.अनामय महेश बेळेकर | ४७७/५०० | ९५.४०% |
| ३. | कु.अनिकेत निलेश वाडकर | ४७६/५०० | ९५.२०% |

विशेष प्राविण्य (Dist.) १३९
प्रथम श्रेणी ९७
द्वितीय श्रेणी ५२
तृतीय श्रेणी ०८
एकूण २९६

माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा विभाग

सन २०१५ साली घेण्यात आलेल्या माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेला प्रशालेतील एकूण ५७ विद्यार्थी प्रविष्ठ झाले. त्यापैकी ५१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. निकाल ९५.२७% लागला. एकूण ०६ विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक झाले.

| अ.क्र. | विद्यार्थ्यांचे नाव | गुणप्राप्त | क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | कु.पडिये तुषार दिलीप | २४२ | जिल्ह्यात ७ वा |
| २. | कु.घाणेकर पूर्वा किरण | २२० | जिल्ह्यात १६ वी |
| ३. | कु.नलावडे वैष्णवी संजय | २२० | जिल्ह्यात १६ वी |
| ४. | कु. पाडाळकर श्रीरंग प्रशांत | २१६ | जिल्ह्यात १८ वा |
| ५. | कु.किनरे प्राप्ती शिवराम | २१४ | जिल्ह्यात १९ वी |
| ६. | कु. होरबे स्वरुपा चंद्रकांत | २०२ | जिल्ह्यात २५ वी |

माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेसाठी प्रशालेतील श्री.शेलार,साखळकर, श्री.पडवेकर, सौ. अभ्यंकर, सौ.बागवे, सौ.कांबळे या शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले. सन २०१६ साली शासनाने १ वर्ष माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा न घेण्याचा निर्णय घेतल्याने यावर्षी प्रशालेतर्फे विद्यार्थी प्रविष्ठ झाले नाहीत.

**महाराष्ट्र ज्ञानपीठ (गणित)**

सन २०१५ या शैक्षणिक वर्षात इ.५ वी ते ७ वीचे विद्यार्थी गणित ज्ञानपीठ परीक्षेसाठी बसले होते.

इ. ५ वी परीक्षेत कु.कामत तन्वी विवेक ही विद्यार्थिनी १००/१०० गुण मिळवून विद्यापीठात पहिली आली.

प्रशालेतील क्रमांक प्राप्त विद्यार्थी – प्रथम क्रमांक – कु. कामत तन्वी विवेक
द्वितीय क्रमांक – कु.गार्डी श्रुती विनायक
तृतीय क्रमांक – कु.भावे आदिती दिपक
कु. भारमल सिध्देश राजेंद्र

प्रशालेतील क्रमांक प्राप्त विद्यार्थी – प्रथम क्रमांक – कु. नवाथे श्रेया विश्वजीत

हिंदी विभाग

महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा पुणे २०१५

१. राष्ट्रभाषा हिंदी बालबोधिनी परीक्षा (इ.५वी) व राष्ट्रभाषा हिंदी प्राथमिक परीक्षा इ.६ वी व इ.७ वी चा निकाल १००% लागला.

२. महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा, पुणे- सुबोध परीक्षा (फेब्रुवारी २०१५) निकाल १००%

**संस्कृत विभाग अहवाल**

शैक्षणिक वर्ष २०१५-१६ चा इ. १० वी चा निकाल १००% लागला.दरवर्षीप्रमाणे मराठा मंदिर,महाराष्ट्र विद्यापीठ संस्कृत बाह्य परीक्षा घेण्यात आल्या. तसेच संस्कृत विभागातर्फे संस्कृत दिन प्रशालेत साजरा करण्यात आला.

**इंग्रजी विभाग**

ISF मार्फत घेण्यात येणाऱ्या इंग्लिश आलिंपियाड परीक्षेसाठी इ. ५वी ते १० वी अखेर ३० विद्यार्थी प्रविष्ठ झाले आहेत. या परीक्षेचा निकाल दरवर्षी १००% लागतो.

**कोकण प्रज्ञा शोध परीक्षा**

र.ए.सोसायटीतर्फे घेण्यात येणाऱ्या कोकण प्रज्ञा शोध परीक्षेसाठी शै.वर्ष २०१५-१६ साठी रा.भा.शिर्के प्रशालेतील इ.८वी व ९ वी मधून १८१ विद्यार्थी प्रविष्ठ झाले आहेत.

**हस्तलिखित अहवाल**

प्रतिवर्षाप्रमाणे सन २०१५ -१६ या शैक्षणिक वर्षामध्ये इ.५वी ते १० च्या विद्यार्थ्यांचे विकास नावाचे हस्तलिखित स्नेहसंमेलनाच्या दुसऱ्या दिवशी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रकाशित करण्यात येते. यातून एखाद्या कवीची,लेखकाची निर्मिती होत असते. विद्यार्थी स्वतः कविता,कथा,गोष्ट,प्रवासवर्णन व अन्य साहित्य लिहितात तसेच सुंदर चित्रांचाही समावेश या हस्तलिखितामध्ये असतो.

**गणित विभाग**

सन २०१५ -१६ या शैक्षणिक वर्षासाठी गणित विषयाच्या संदर्भात जून महिन्यामध्ये वार्षिक नियोजन करण्यात आले. गणित छंद मंडळाच्या वतीने विद्यार्थी मंडळाची कार्यकारिणी स्थापन करण्यात आली.

अध्यक्ष - १) विद्यार्थिनी - कु.प्राची दिपक माळी

२) विद्यार्थी - कु.श्रीरंग दत्तात्रय रायरीकर

यांची निवड करण्यात आली, त्याचबरोबर इतर कार्यकारीणी सदस्यांची निवड करण्यात आली. छंद मंडळामार्फत सूत्र पाठांतर स्पर्धा घेण्यात आली.

**वाचू आनंदे विभाग**

वाचू आनंदे हा विद्यार्थ्यांच्या वाचनास व लेखनास प्रोत्साहन देणारा विभाग. विद्यार्थ्यानी अधिक वाचावे म्हणून ग्रंथपाल सौ. चव्हाण यांच्या मदतीने पुस्तक प्रदर्शन व ग्रंथपेट्या असे उपक्रम करण्यात येतात. भूतपूर्व राष्ट्रपती डॉ.अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त दि. १५/१०/२०१५ रोजी साजरा करण्यात आला. प्रशालेतील शिक्षक श्री.देवळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली इ.१० ची अ च्या विद्यार्थ्यानी केलेल्या व्यक्तिमत्व विकास विषयांतर्गत डॉ.कलाम यांच्या जीवनाचा वेध घेणाऱ्या 'कलाम तुझे सलाम' ह्या स्मृतीसंग्रहपर प्रकल्प अहवालाचे प्रकाशन र.ए.सोसायटीचे कार्याध्यक्ष ॲड. विलासजी पाटणे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. हा वैशिष्टयपूर्ण उपक्रम ठरला.

**कला विभाग**

महाराष्ट्र शासनाची बाल चित्रकला स्पर्धा - सहभागी विद्यार्थी २४०

महाराष्ट्र शासनाची - रेखा व रंगकला परीक्षा - सहभागी विद्यार्थी

एलिमेंटरी – ४५ इंटरमिजिएट – ४३

लायन्स क्लब, रत्नागिरी आयोजित पीस पोस्टर स्पर्धा – सहभागी विद्यार्थी १५

तरुण भारत वर्धापन दिनानिमित्त आयोजित चित्रकला स्पर्धा – सहभागी विद्यार्थी ७५०

**शारीरिक शिक्षण विभाग**

सन २०१५–१६ या शैक्षणिक वर्षात रा.भा.शिर्के प्रशालेत क्रीडा विभागामार्फत प्रशालेचे खो–खो, कबड्डी, फुटबॉल, बास्केटबॉल, ॲथलॅटिक्स तसेच बुध्दिबळ, कॅरम, कराटे, ज्युडो, बॅडमिंटन, कुस्ती इ.प्रकारच्या खेळांच्या शासकीय व खाजगी स्पर्धांमध्ये उत्तम यश प्राप्त केले आहे. सन २०१५–१६ जिल्हयामध्ये क्रिडास्पर्धा मध्ये प्रथम येण्याचा मान पटकावून प्रशालेला २ लाखाचे अनुदान प्राप्त झाले.

सन २०१५–१६ राष्ट्रीय स्पर्धेत सहभागी खेळाडू

१.कु. पूर्वा शिवराम किनरे

शालेय योगा स्पर्धा, अहमदनगर सांघिक आसने – सुवर्णपदक

वैयक्तिक आसने – सुवर्णपदक

या स्पर्धेत Best of the Best Girls हा पुरस्कारही पूर्वा किनरेने प्राप्त केला.

राष्ट्रीय फेडरेशन योगासन स्पर्धा, हैद्राबाद – वैयक्तिक आसने – कांस्यपदक

रिदमिक योगा पेअर – रौप्यपदक

२.कु.अपेक्षित अनिल उरुणकर (१० वी ड) बिहार येथे झालेल्या १७ वर्षे वयोगटातील क्रिकेट स्पर्धेमध्ये सहभागी झाला.

३. कु.अविनाश यशवंत सावंत (१० वी) पुणे इथे झालेल्या १७ वर्षे वयोगटातील कराटे स्पर्धेमध्ये सहभागी झाला.

४. कु.मार्तंड संजय झोरे – तलवारबाजी

५. कु.अपुर्वा राजकुमार नाचणकर – कॅरम

६. कु. अपेक्षा अनिल सुतार (१० अ) ऑल इंडिया गोल्डन ज्युब्ली, चॅम्पियनशिप पुणे येथे झालेल्या खो–खो स्पर्धेत ४ th Place प्राप्त. तसेच हुमकूर, कर्नाटक येथे झालेल्या १७ वर्षाखालील खो – खो स्पर्धेमध्ये सहभागी झाली. कु.अपेक्षा सुतार हिने शै.वर्षात एकूण ०४ राज्यस्तरीय स्पर्धेत सहभाग घेतला. Under – १८, जळगांव, Open – फलटण, पायका Under – १६,

अहमदनगर, शेगांव, महिला खो–खो, जळगांव.

७. कु.प्राप्ती शिवराम किनरे (०८ अ) ही दोन राष्ट्रीय स्पर्धेमध्ये सहभागी झाली.

योगा – १. शालेय राष्ट्रीय स्पर्धा – हैद्राबाद सुवर्णपदक

२. रत्ना.जिल्हा.असो.तर्फे, मँगलोर राष्ट्रीय स्पर्धेत निवड झाली.

असे एकूण ०५ खेळाडू या शैक्षणिक वर्षात राष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होऊन त्यांनी उत्तम यश संपादन केले आहे.

**सन २०१५–१६ राज्यस्तरीय खेळाडू**

कु.पुर्वा शिवराम किनरे (योगासन) राज्यात दुसरा क्रमांक, कु.प्राप्ती शिवराम किनरे (योगासन) राज्यात दुसरा क्रमांक, कु.अपेक्षित अरुण उरुणकर (क्रिकेट), कु.अविनाश यशवंत सावंत (कराटे), कु. अपेक्षा अनिल सुतार (खो–खो ४ स्पर्धा), कु.धनश्री जयराज पाटील (खो–खो ४ स्पर्धा), कु.मैथिली अरविंद जाधव (खो–खो २ स्पर्धा), कु.मैथिली दिपक गावडे (कबड्डी), कु.स्नेहा सुनिल पाटील (कॅरम), कु.अपुर्वा राजकुमार नाचणकर (कॅरम), कु.श्रेया संतोष आंबवकर

(कॅरम),कु.सुयश सतिश भागवत (कॅरम), कु.तन्मय खातू (कॅरम), कु.केतन दिलीप साळुंखे (कॅरम)

**स्वराज्य सभा आणि सांस्कृतिक विभाग अहवाल**

दि. ०५/०६/२०१५ रोजी प्रशालेत जागतिक पर्यावरण दिन साजरा केला गेला. तसेच २१ जून २०१५ रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा केला गेला. यामध्ये शिर्के प्रशालेचा सक्रीय सहभाग होता. सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षातील स्वराज्य सभेची निवडणूक दि.२९/०६/२०१५ रोजी पार पडली. यात विद्यार्थी प्रतिनिधी कु.तेजस दत्तात्रय साखळकर व विद्यार्थिनी प्रतिनिधी कु.प्राजक्ता श्रीरंग वैद्य यांची निवड झाली. सर्वात प्रथम शाळेच्या पहिल्या दिवशी म्हणजेच दि.१६ जून रोजी मा.मुख्याध्यापकांनी नवीन विद्यार्थ्यांचे स्वागत गुलाबपुष्प देऊन केले. याप्रसंगी प्रशालेतील सर्व शिक्षक उपस्थित होते.

१ . इ.१० वी गुणगौरव समारंभ - मंगळवार दि.१६/०६/२०१५ रोजी माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा मार्च - २०१५ मध्ये उल्लेखनीय यश मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा प्रशालेतर्फे गुणगौरव करण्यात आला. यावर्षी शाळेचा निकाल ऐतिहासिक १००% लागला. यावेळी विशेष गुणवत्ताधारक कु.तेजस दिपक बंडबे (९६.४०%), कु.अनामय महेश बेळेकर (९५.४०%),कु.अनिकेत निलेश वाडकर (९५.२०%) यांसह अन्य विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला.

२. शाहू महाराज जयंती :- दि.२६/०६/२०१५ रोजी प्रशालेत शाहू महाराज जयंती साजरी करण्यात आली. यावेळीप्रशालेतील शिक्षक श्री.आर.वाय.कांबळे सर यांनी शाहू महाराजांचा जीवनपट आपल्या ओघवत्या शैलीत विद्यार्थ्यांसमोर मांडला. शाहू महाराजांचे अनेक गुण विद्यार्थ्यांना अनुकरणीय आहेत असे त्यांनी आपल्या भाषणांत नमूद केले. याप्रसंगी प्रशालेचे मुख्याध्यापक श्री.पोवार सर व सर्व शिक्षक उपस्थित होते.

३. दि.३० जून २०१५ रोजी प्रशालेतील सहाय्यक शिक्षिका सौ. कोळपे मॅडम आपल्या २१ वर्षाच्या सेवेतून निवृत्त झाल्या. त्यांचा निरोप समारंभ या दिवशी साजरा करण्यात आला. त्याचप्रमाणे नियोजनानूसार लोकसंख्या विस्फोट दिन, गुरुपौर्णिमा,लोकमान्य टिळक पुण्यतिथी, क्रांतीदिन,रक्षाबंधन व संस्कृत दिन,,शिक्षक दिन,जागतिक ओझोन दिन, गांधीजी व शास्त्रीजी जयंती,जागतिक एड्स दिन इ. दिन विद्यालयात साजरे करण्यात येऊन संस्कृतीचे जतन तसेच सामाजिक समस्याविषयी जनजागरण आणि राष्ट्रीय नेत्याचा वारसा जपण्याचा प्रयत्न करण्यात आला.

**परीक्षा विभाग**

परीक्षा विभागामार्फत इ.५ वी ते १० पर्यंतचे शालेय परीक्षांचे आयोजन व नियोजन केले जाते. यामध्ये प्रामुख्याने इ.१० वी सराव परीक्षा, इ.५ वी ते १० वी घटक चाचणी परीक्षा, इ.५ वी ते १० वी सत्र परीक्षा, इ.१० वी पूर्व परीक्षा तसेच शासनामार्फत आयोजित इ.५ वी ते ८ वी साठी पायाभूत चाचणी परीक्षा यांचा अंर्तभाव होतो.

**स्पर्धा विभाग अहवाल**

शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मध्ये डिसेंबर २०१५ या महिन्यांपर्यंत विविध प्रकारच्या स्पर्धा संपन्न झाल्या. यात प्रशालेतील अनेक विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश मिळविले आहे.

१. लिटील व्हॉईस ऑफ रत्नागिरी प्रथम क्रमांक - कु.ईशानी मनोज पाटणकर (१० वी)

२. संस्थांतर्गत पठण स्पर्धा - प्रथम क्रमांक - क. साखळकर तेजस दत्तात्रय (१० वी अ)

३. संस्थांतर्गत हस्ताक्षर व शुध्दलेखन स्पर्धा ( गट इ. ५ वी ते ७ वी )

मराठी हस्ताक्षर स्पर्धा

मराठी शुध्दलेखन स्पर्धा

इंग्रजी हस्ताक्षर स्पर्धा

इंग्रजी शुध्दलेखन स्पर्धा

संस्थांतर्गत हस्ताक्षर व शुध्दलेखन स्पर्धा (गट इ.८ वी ते १० वी)

मराठी हस्ताक्षर स्पर्धा

मराठी शुध्दलेखन स्पर्धा

इंग्रजी हस्ताक्षर स्पर्धा

४. रत्नागिरी नगर परिषद मार्फत श्रावणगीत स्पर्धा

५. संस्थांतर्गत नाट्यवाचन स्पर्धा

६. संस्थांतर्गत आंतरशालेय निबंध स्पर्धा

७. खल्वायन, रत्नागिरी आयोजित फिनोलेक्स चषक शालेय गीत गायन स्पर्धा इ. स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी सहभाग घेवून उल्लेखनीय यश प्राप्त केले.

## NCC विभाग

रा.भा.शिर्के प्रशालेचा एन.सी.सी. विभाग हा एक महत्वाचा विभाग आहे. यामध्ये इ. ८वी चे (First Year Cadets) २८ व इ.९ वी चे (Second Year Cadets) २२ असे एकूण ५० विद्यार्थी एन.सी.सी. छात्र म्हणून सहभागी आहेत. यामध्ये Second Year कु.स्वप्निल नेताजी पाटोळे (JD) मुलांचा P.O. म्हणून तर कु. साक्षी नितीन गझने मुलींची(PO.) म्हणून कार्यरत आहेत.First Year चे Leading Cadet म्हणून कु.मिहीर सरदेसाई (JD) तर J.W. म्हणून कु.ऐश्वर्या झोरे हे कार्यरत आहेत. R.D.C. Camp कोल्हापूर येथे होणाऱ्या कॅम्पसाठी कु.तन्वी शिंदे, कु.नईम खान, कु.चिन्मय सुर्वे व कु.सौरभ पाडवे यांची निवड झाली तर S.T.C. Camp बिहार येथे होणाऱ्या कॅम्पसाठी कु. चिन्मय सुर्वे ह्या कॅडेटची निवड झाली. दि. २६ नोव्हेंबर २०१५ रोजी N.C.C. Day साजरा करण्यात आला. कुवारबांव येथे झालेल्या A.T.C. कॅम्प मध्ये एन.सी.सी. कॅडेटनी उत्कृष्ट प्रदर्शन केले. या कॅम्पमध्ये एकूण २५ कॅडेट सहभागी झाले होते. वेगवेगळ्या स्पर्धांमध्ये आपल्या प्रशालेला उत्कृष्ठ यश मिळवून दिले. १.Tent Pitching कु.चिन्मय सुर्वे, कु.सिध्दी मजगांवकर, कु.हर्षदा नाईकनवरे, कु.साक्षी गझने, कु.तन्वी शिंदे २.Tug of war – कु. साक्षी गझने, कु.दिक्षा बागवे, कु.नईम खान, कु.अथर्व नेने, कु.स्वप्निल पाटोळे, कु.चिन्मय सुर्वे ३.Debate – कु. अथर्व नेने, कु.हर्षदा नाईकनवरे, कु.श्रीरंग रायरीकर, ४.Drill कु.साक्षी गझने,कु.सिध्दी मजगांवकर, कु.स्वप्निल पाटोळे,कु.हर्षदा नाईकनवरे,कु.प्रथमेश ताम्हणकर,कु.चिन्मय सुर्वे, ५. Knots कु.श्रीरंग रायरीकर,कु.सौरभ पाडावे.६. Rifiling कु.श्रीरंग रायरीकर,कु.सौरभ पाडावे ७. Service Subject – कु.हर्षदा नाईकनवरे,कु.साक्षी गझने ८.Quiz Competition कु.अथर्व नेने. ९.Semafor कु.चिन्मय सुर्वे या कॅम्पमध्ये कॅडेटनी २ मेडल व ९ ट्रॉफी प्राप्त केल्या.

**महाराष्ट्र छात्रसेना**

रा.भा.शिर्के प्रशालेमध्ये इ. ८ वी व ९ वी या वर्गासाठी महाराष्ट्र छात्रसेना हा विषय ऐच्छिक ठेवण्यात आलेला आहे. सन २०१५-१६ या वर्षासाठी इ.८ वी ला ११३ विद्यार्थी व इ. ९ वी ला १५६ विद्यार्थी असे एकूण २६९ विद्यार्थी या विषयासाठी आहेत. संपूर्ण वर्षभरात प्रशालेमध्ये व विषयांतर्गत अनेक उपक्रम साजरे होतात. बाहेरील सामाजिक, शैक्षणिक उपक्रमात महाराष्ट्र छात्रसेनेचे विद्यार्थी व शिक्षक सहभागी होतात.

**विज्ञान विभाग**

१. विज्ञान रंजन परीक्षा :-

२. डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धा :-

३. अखिल भारतीय विद्यार्थी विज्ञान मेळावा

प्रकाशाचे उपयोग शक्यता व आव्हाने, या विज्ञान मेळाव्यात कु.अक्षता पिसे (९ वी अ) हिने सादरीकरण केले होते.

४. विज्ञान छंद मंडळ

१. भित्तीपत्रक स्पर्धा २. प्रश्नमंजुषा ३. हस्तलिखित ४. अंधश्रध्दा निर्मूलन ५. विज्ञान सहल (शिक्षक) ६. विज्ञान दिन ७. शालांतर्गत विज्ञान प्रदर्शन इ. विज्ञान छंद मंडळातर्फे इ.९ वीच्या विद्यार्थ्यांसाठी विज्ञान विषयक कात्रणांच्या संकलनातून भित्तीपत्रकाचा उपक्रम राबविण्यात येतो.

५. Science Olympiad Foundation,Delhi : -

६. NTS/NMMS-

ह्या स्पर्धेचे आयोजन महाराष्ट्र राज्य परीक्षा परीषद, पुणे यांच्यामार्फत केले जाते. शै. वर्ष २०१४-१५ मध्ये घेतल्या गेलेल्या NTS परीक्षेला १७ विद्यार्थी तर NMMS परीक्षेला १५ विद्यार्थी प्रविष्ठ झाले होते. त्यातील NMMS परीक्षेत कु.तन्वी भालेकर, कु.शामल सुकम, कु.प्रसाद तेंडुलकर हे शासनाच्या शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरले आहेत. शै. वर्ष २०१५-२०१६ साठी NTS परीक्षेला १७ विद्यार्थी तर NMMS परीक्षेला ०७ विद्यार्थी प्रविष्ठ झाले आहेत. यासाठी श्री.के.डी. कांबळे व श्री. आर.एन.ढोले. यांनी मार्गदर्शन केले.

७.MTS -

वाडीया कॉलेज, पुणे आयोजित एप्रिल २०१५ मध्ये घेतल्या गेलेल्या परीक्षेला ०९ विद्यार्थी प्रविष्ठ झाले होते. या परीक्षेत कु.तेजस साखळकर याचा प्रशालेत प्रथम, राज्यात १३ वा क्रमांक प्राप्त झाला व शिष्यवृत्ती व प्रमाणपत्र धारक ठरला. तर कु. अथर्व महाले यास प्रशालेत द्वितीय व कु.सुकन्या गोसावी हिस तृतीय क्रमांक प्राप्त झाला व विशेष पारितोषिकासाठी पात्र ठरले. अन्य विद्यार्थी प्रमाणपत्रधारक ठरले. यासाठी श्री.के.डी.कांबळे सर यांनी मार्गदर्शन केले.

**ग्रंथालय विभाग**

गेली ३ वर्षे शिक्षक पुस्तक भिशी हा उपक्रम राबविला जात आहे. या उपक्रमाद्वारे ५० पुस्तके ग्रंथालयास प्राप्त झाली. डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त दि.१५ ऑक्टोबर २०१५ रोजी वाचन प्रेरणा दिनानिमित्त ग्रंथ प्रदर्शन भरविण्यात आले. याचा लाभ सर्व शिक्षक , विद्यार्थी व प्रशालेचे शिक्षकेतर कर्मचारी यांनी घेतला. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण होत असून जास्तीत जास्त विद्यार्थी वाचनाचा लाभ घेत आहेत.

**व्यवसाय मार्गदर्शन विभाग**

सुमंगल संस्था, पुणे यांच्यामार्फत इ.९ वी व १० वी च्या विद्यार्थ्यांची कल चाचणी आयोजित करण्यात आली तसेच विद्यार्थी व पालक यांचे उद्‌बोधन व समुपदेशन अया संयुक्त कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

**शालेय किशोरावस्था जीवन कौशल्ये शिक्षण कार्यक्रम(सालसेप)**

* दि. ९ जुलै २०१५ - विद्यार्थिनींना मार्गदर्शन
* दि. ४ ऑगस्ट २०१५

इ. ६ वी ७ वी च्या विद्यार्थिनी व मातापालक यांच्यासाठी मार्गदर्शन वर्ग आयोजित करण्यात आला होता. मीना राजू मंच अंतर्गत झालेल्या या कार्यक्रमामध्ये पौंगडावस्था होणारे वर्तनबदल व Menstrual Higiene Management संदर्भात सखोल मार्गदर्शन डॉ.सौ. गद्रे पी.जे यांनी केले. तसेच विद्यार्थिनी व मातापालक यांच्या शंकाचे निरसन केले. वरील दोन्ही विषयांतर्गत सालसेप नोडल टीचर सौ. पाटील एस.एन. यांनी मार्गदर्शन केले.

* १ ऑक्टोबर २०१५ जागतिक रक्तदान दिन व दि.१ डिसेंबर २०१५ जागतिक एड्स दिन साजरे करण्यात आले.

या दिनांच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना रक्तदानाचे महत्व व एड्स रोगाचा प्रतिबंध व जाणीव व जागृती या हेतूने सालसेप विभागातर्फे नोडल टीचर सौ.पाटील एस.एन. यांनी निबंध व चित्रकला स्पर्धेचे आयोजन केले.

**माहिती संप्रेषण तंत्रज्ञान**

सन २०१५-१६ मध्ये रा.भा.शिर्के प्रशालेत महाराष्ट्र शासन शिक्षण संचालनालय (माध्य.व उच्च माध्यमिक)

महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्यावतीने व सहभाग बिर्ला श्लोका एज्युटेक लिमिटेड व व्हिजन इंडिया सॉफ्टवेअर एक्स्पोर्टस मार्फत आय.सी.टी.लॅब (टप्पा ३) ची सुरुवात करण्यात आली. या ICT लॅबसाठी १२ संगणक संच व ॲक्सेसरीज उपलब्ध झाले. त्याचबरोबर श्रीमती अम्रिता अजित साळवी यांची Computer Instructor म्हणून नेमणूक झाली.

**राष्ट्रीय हरितसेना**

सप्टेंबर महिन्यामध्ये १५ सप्टेंबरला विद्यार्थ्यांना गणपतीची मूर्ती प्लॅस्टर ऑफ पॅरिसची न घेता ती शाडूच्या मातीची घ्यावी व निर्माल्य पाण्यांत न टाकता त्याचे खत करण्यासंदर्भात उद्बोधन करण्यात आले. तसेच प्रदूषणासंदर्भात मार्गदर्शन करण्यात आले. ऑक्टोबर महिन्यामध्ये २ ऑक्टोबरला स्वच्छता दिनानिमित्त शाळेच्या आवारात हरितसेनेच्या विद्यार्थ्यांमार्फत स्वच्छता करण्यात आली. सामाजिक वनीकरणामार्फत राष्ट्रीय वन्य पशू दिनानिमित्त गोगटे कॉलेज ते प्रमोद महाजन क्रीडा संकुल पर्यंत हरितसेनेच्या विद्यार्थ्यांमार्फत रॅली काढण्यात आली.

**भारत स्काऊट / गाईड विभाग**

आपल्या रा.भा.शिर्के प्रशालेत स्काऊट गाईड हे पथक अनेक वर्ष चालू आहे. तसेच रिमांड होम/जिल्हा कारागृह या ठिकाणी निवडक गाईड्स रक्षाबंधनासाठी उपस्थित राहतात. त्याचबरोबर जिल्हा स्काऊट-गाईड कार्यालयामार्फत आयोजित फ्री बीईंग मी या कार्यक्रमासाठी /उपक्रमात निवडक गाईड्स सहभागी झाल्या होत्या.

**गरीब विद्यार्थी निधी**

प्रशालेतील गरीब व होतकरु विद्यार्थ्यांना मदतीचा हात देऊन शिक्षणात गुणवत्ता वाढविण्याची मानसिकता दृढ करण्यासाठी हा उपक्रम चालू आहे. गेल्या ५० वर्षात अशा हजारो विद्यार्थ्यांना या विभागामार्फत मदत देण्यात आली आहे. यावर्षी २८ विद्यार्थ्यांना वह्या, ०४ विद्यार्थ्यांना गणवेश, १३ विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क व १ विद्यार्थ्यांना एस.टी.पास शुल्क मदत स्वरुपात देण्यात आले आहे. प्रशालेतील आजी विद्यार्थी व शिक्षकांप्रमाणेच माजी विद्यार्थीही त्यांच्या वाढदिवसानिमित्त किंवा आनंदाप्रित्यर्थ सढळ हस्ते देणग्या देऊन या निधीला आपला आधार देतात हे खास वैशिष्ट्य आहे.

पालक शिक्षक संघ

यावर्षी शनिवार दि.३०/०७/२०१५ रोजी सकाळी कार्यकारी मंडळ सभेत पदाधिकारी यांची निवड करण्यात आली. अध्यक्ष - श्री. बी.डी.पोवार सर (मुख्याध्यापक), उपाध्यक्ष- श्री.काशिनाथ यशवंत पाटील, सचिव- श्री.आर.एस.माळगे (पर्यवेक्षक), सर्व नवनिर्वाचित सदस्य व पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करण्यात आले. दि.२७/१०/२०१५ रोजी कार्यकारिणी सभा आयोजित करण्यात आली होती.

**विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारा शिक्षकवृंद**

१. श्री.एन.टी.देवळेकर सर

२. श्री.आर.पी.रहाटे सर.

३. सौ.सप्रे एस.यू.

या शाळेत मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक, पर्यवेक्षक मिळून ३९ शिक्षक व ११ शिक्षकेतर कर्मचारी आहेत. या शाळेची विद्यार्थी संख्या १५०४ एवढी आहे..धन्यवाद

सही/-

**श्री.पोवार**

**मुख्याध्यापक**

**रा.भा.शिर्के प्रशाला, रत्नागिरी**